**ठळक बातम्या**

- २०१३ च्या तुलनेत राज्यात केवळ १० टक्के नक्षलवादी शिल्लक राहिल्याचं नक्षलप्रभावित राज्यांच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांची पैसे हस्तांतरण यंत्रणा एकमेकांशी जोडण्याचे प्रयत्न सुरू असल्याची मंत्री पीयूष गोयल यांची माहिती
- माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचा भाजपाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश

**आणि**

- यंदाचा विष्णुदास भावे पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर

**<><><><><>**

राज्यात माओवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात यश आलं आहे. २०१३ च्या तुलनेत सध्या राज्यात केवळ १० टक्के नक्षलवादी शिल्लक असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. प्रथमच गडचिरोली जिल्ह्याचा उत्तर भाग सशस्त्र माओवाद्यांपासून मुक्त झाला असल्याचं ते म्हणाले. देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक आज नवी दिल्ली इथं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी राज्यातल्या परिस्थितीविषयी मुख्यमंत्री शिंदे यांनी माहिती दिली.

नक्षलग्रस्त भागातल्या रहिवाशांचा विश्वास जिंकण्यासाठी आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या योजनांची यशस्वी अंमलबजावणी राज्य शासनाने केली असल्याचं ते म्हणाले. राज्यात गेल्या सहा वर्षांत माओवादविरोधी अभियानाअंतर्गत ९६ सशस्त्र नक्षली मारले गेले, १६१ पकडले गेले आणि ७० जणांनी आत्मसमर्पण केलं. २०१३ मधे राज्यात माओवादी कॅडरची संख्या ५५० होती, ती आता ५६

वर उतरली आहे. भामरागड परिसरात १९ गावांनी माओवाद्यांना गावात बंदी घातली आहे. नक्षलप्रभावित भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणारे उद्योग तसंच पायाभूत सुविधा विकासाला चालना देण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहितीही शिंदे यांनी दिली. संबंधित भागात सुरक्षा आणि शिक्षण यासाठी अर्थसहाय्य तसंच पोलिसांना विशेष प्रशिक्षण आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाकडून अतिरिक्त मनुष्यबळ यांची मागणी मुख्यमंत्र्यांनी मांडली.

**<><><><><>**

नक्षलवादाने कोणाचंही भलं झालेलं नाही. नक्षलवादी मार्ग चोखाळणाऱ्या सर्वांनी मुख्य प्रवाहात येऊन शस्त्रांचा त्याग करावा असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं आहे. देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक आज अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झाली, त्यानंतर ते बोलत होते. नक्षलवादी कारवायांविरुद्धची लढाई अंतिम टप्प्यात असून सर्व घटकांकडून सहकार्य मिळाल्यास मार्च २०२६ पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगण, ओडीशा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री बैठकीत उपस्थित होते.

**<><><><><>**

भारताची UPI आणि संयुक्त अरब अमिरातीची AANI पैसे हस्तांतरण यंत्रणा एकमेकांशी जोडण्याचे दोन्ही देशांचे प्रयत्न सुरू आहेत. यामुळं संयुक्त अरब अमिरातीमध्ये राहणाऱ्या ३० लाख भारतीयांना सहजपणे भारतात पैसे पाठवता येतील, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. भारत आणि UAE उच्च स्तरीय संयुक्त कृती दलाच्या १२ व्या बैठकीनंतर मुंबईत ते वार्ताहरांना संबोधित करत होते. UAE नं भारतात फूडपार्क स्थापन करायची तयारी दाखवली

आहे. यात येत्या २-अडीच वर्षात २ अब्ज डॉलरची गुंतवणूक अपेक्षित आहे. यामुळं UAE मध्ये खाद्यसुरक्षा येईल, भारतीय शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढेल आणि भारतीय युवकांसाठी रोजगाराच्या संधी वाढतील, असं गोयल यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

केंद्र सरकार आदिवासी जनतेच्या विकासासाठी वचनबद्ध आहे, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले. पालघर जिल्ह्यातल्या जव्हार पेसा ग्रामसभा महासंमेलन झालं, त्यावेळी ते बोलत होते. नाशिकमध्ये आदिवासी विद्यापीठाची स्थापना होईल, त्यात अभियांत्रिकी महाविद्यालयही असेल असं राज्यपालांनी यावेळी सांगितलं. यात जास्तीत जास्त जागा आदिवासी समुदायातल्या विद्यार्थ्यांसाठी राखीव असतील असं ते म्हणाले.

<><><><>

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी आज भाजपाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. इंदापुरातल्या कार्यकर्त्यांच्या आणि जनतेच्या आग्रहामुळे हा निर्णय घेतल्याचं पाटील म्हणाले. हर्षवर्धन पाटील यांची मुलगी अंकिता यांनीही भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा देऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे.

<><><><>

विनोद अग्रवाल यांचं निलंबन भाजपानं आज मागे घेतलं. गेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षानं उमेदवारी न दिल्यानं अपक्ष लढत त्यांनी विजय मिळवला होता. गेल्या ५ वर्षात अग्रवाल यांनी कोणत्याही पक्षात प्रवेश केला नव्हता. यंदा विनोद अग्रवाल यांना महायुती गोंदियातून उमेदवारी देणार असल्याचं आमदार परिणय फुके यांनी सांगितलं.

<><><><>

आमदार बच्चु कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार राजकुमार पटेल हे शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. येत्या १० ऑक्टोबरला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मेळघाट दौऱ्यावर असून त्यांच्या उपस्थितीत आपण शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती पटेल यांनी आज दिली. बच्चु कडू यांनी स्थापन केलेल्या तिसऱ्या आघाडीतून आपण विधानसभा निवडणुकीत निवडून येऊ शकणार नाही, त्यामुळे हा निर्णय घेत असल्याचं पटेल यांनी सांगितलं.

<><><><>

यावर्षीचा वैद्यकशास्त्रातला नोबेल पुरस्कार व्हिक्टर अँब्रोस आणि गॅरी रुवकुन या संशोधक जोडीला जाहीर झाला आहे. मायक्रो आरएनए आणि जनुकीय

हालचालींच्या नियंत्रणात त्याची भूमिका या शोधाबद्दल त्यांना हा ११ लाख अमेरिकी डॉलर्सचा हा पुरस्कार मिळाला असल्याचं नोबेल पुरस्कार देणाऱ्या कॅरोलिन्स्का इन्स्टीट्यूटनं जाहीर केलं. जीवाची वाढ आणि कार्य समजण्यात या शोधामुळे मदत होते. १९०१ पासून देण्यात येणाऱ्या नोबेल पुरस्कारांचं हे ११५वं वर्ष आहे. भौतिकशास्त्रासाठीचा पुरस्कार उद्या तर रसायनशास्त्रासाठीचा पुरस्कार परवा म्हणजेच येत्या बुधवारी जाहीर होईल.

**<><><><><>**

यंदाचा विष्णुदास भावे पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर झाला आहे. सांगलीच्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचं स्वरूप- गौरव पदक, पंचवीस हजार रुपये, आणि स्मृतीचिन्ह असं आहे. रंगभूमी दिनाचं औचित्य साधून येत्या ५ तारखेला १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल यांच्या हस्ते हे गौरव पदक देण्यात येणार आहे.

सुहास जोशी यांनी गेली अनेक वर्ष मराठी आणि हिंदी चित्रपट, नाटक, तसंच मालिकांमध्ये विविध भूमिका साकारल्या. त्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यात संगीत नाटक अकादमी पुरस्कार, नाट्य दर्पण, मुंबई दूरदर्शनचा सह्याद्री नवरत्न पुरस्कार, व्हिडिओकॉन स्क्रीन पुरस्कार, अशा अनेक पुरस्कारांचा समावेश आहे. आता विष्णुदास भावे पुरस्कार मिळाल्याबद्दल आकाशवाणीशी बोलताना सुहास जोशी यांनी आनंद व्यक्त केला....

**होल्ड- बाईट- सुहास जोशी**

**<><><><><>**

आगामी काळात महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यांत संविधान भवन उभारण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत केली. विरोधक संविधानाबद्दल सामान्य नागरिकांची दिशाभूल करत आहे. नागरिकांच्या मनातील हा संभ्रम दूर व्हावा, याकरता संविधान भवनाच्या माध्यमातून वास्तव स्थितीची माहिती करून देण्यात येईल असं रिजिजू म्हणाले. महाराष्ट्रातल्या बौद्ध विहारांचा विकास करण्यात येईल असंही रिजिजू म्हणाले.

<><><><><>

साहित्य संमेलनात राजकारण्यांना बोलावू नका. साहित्य विषयक कार्यक्रम हे साहित्यिकांनी बोलावं आणि राजकारण्यांनी ऐकावं, असेच असले पाहिजेत, अशी अपेक्षा मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी व्यक्त केली आहे. ते आज पुण्यात, दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचं अनावरण केल्यानंतर बोलत होते. राजमुद्रा आणि लेखणीचा अंतर्भाव असलेल्या बोधचिन्हाची निवड करण्याची शिफारस त्यांनी केली होती. राज्यातल्या राजकारणाची आणि राजकारण्यांच्या भाषेची पातळी अतिशय खाली गेली आहे. या राजकारण्यांना साहित्यिकांनी ठणकावलं पाहिजे, अशी अपेक्षा राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज सलग पाचव्या सत्रात घसरण झाली. या पाच सत्रात सेन्सेक्स ५ हजार अंकांनी आणि निफ्टी पंधराशे अंकांनी घसरला आहे. दिवसअखेर सेन्सेक्स ६३८ अंकांनी घसरुन ८१ हजार ५० अंकांवर बंद झाला. निफ्टी २१९ अंकांनी घसरुन २४ हजार ७९६ अंकावर बंद झाला.

<><><><><>

राज्यात आज सकाळी दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले आहेत.

तुळजापूरहून दर्शन घेऊन आलेली भाविकांची एक कार सोलापूर-सांगली महामार्गावर मालवाहू ट्रकला धडकल्यामुळे भीषण अपघात झाला. यात दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. हे भाविक कोल्हापूर जिल्ह्यातले रहिवासी आहेत.

**वाशिम** जिल्ह्यातल्या पुसद-वाशिम मार्गावर चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे कार दरीत कोसळली, यात दोघांचा मृत्यू झाला तर सात जण जखमी झाले आहेत.

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागात काल पावसाच्या जोरदार सरींनी हजेरी लावली. मुंबई आणि उपनगरात जोरदार वारे आणि  विजांच्या डकडाटासह पाऊस झाला. येत्या दोन दिवसांत राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मेघगर्जना आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता हवामानविभागाने वर्तवली आहे.